**पोलीस आयुक्तालय, पिंपरी चिंचवड**
**पोलीस उप आयुक्त (गुन्हे)**

---

**प्रेसनोट दि. २६/०८/२०२२**

**गुंडा विरोधी पथक, गुन्हे शाखेची उत्कृष्ठ कामगिरी**

**भोसरीतील प्रगती कलेक्शन मधील महीलेचा खुन करणाऱ्या अनोळखी इसमास काहीएक धागेदोरे नसताना तपास करुन शिताफिने घेतले ताब्यात.**

दि. १६/०८/२०२२ रोजी महीला नामे सौ. पुजा ब्रजकिशोर प्रसाद, वय ३१ वर्षे, रा. लांडगेआळी भोसरी, पुणे मुळगाव रा. नवादागाव, ता. व जि. मुजफ्फरनगर,बिहार ही त्यांचे प्रगती कलेक्शन, लोंढेआळी, भोसरी, पुणे या दुकानात हजर असताना कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणावरुन धारदार शस्त्राने गळयावर वार करुन तिचा खुन केला म्हणुन भोसरी पोलीस ठाणे येथे गु.र.नं.६५५/२०२२ भा.द.वि.कलम ३०२ प्रमाणे अज्ञात इसमाविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आलेला होता.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेता मा. श्री. अंकुश शिंदे सो. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांच्या आदेशानुसार गुन्हे शाखेच्या सर्व युनिटच्या वेगवेगळया टिम तयार करण्यात आल्या, त्यानुसार या गुन्हयाच्या समांतर तपासासाठी गुंडा विरोधी पथकातील ०२ वेगवेगळया टिम तयार करुन तपासास सुरुवात केली.

गुन्हा घडल्यापासुन सलग १० दिवस गुंडा विरोधी पथकातील अंमलदार हे भोसरी चाकण परीसरातील २५० च्या वर ठिकाणचे सी.सी.टी.व्ही.फुटेजची पहाणी करुन त्या भागातील नागरीकांशी सलोख्याचे संबध प्रस्थापित करुन विश्वासात घेवुन सदरच्या आरोपीचा फोटो दाखवुन चौकशी करीत असताना बातमी मिळाली की, सदर वर्णनाच्या इसमाने रांजणगाव पोलीस स्टेशनच्या हददीमध्ये एका ब्युटी पार्लर चालविणाऱ्या महीलेचा मोबाईल व १०,०००/- रु. रोख रक्कमेची चोरी केली आहे. मिळालेल्या माहीतीनुसार रांजणगाव, कारेगाव येथे जावुन सी.सी.टी.व्ही.फुटेजची पहाणी करता भोसरी येथील खुनाचा गुन्हा आणि रांजणगाव येथील चोरीचा गुन्हा करणारा आरोपी हा एकच असल्याचे आमची खात्री झाल्याने आम्ही कारेगाव परीसरामध्ये आरोपीचा फोटो दाखवुन चौकशी करीत असताना एका स्थानिक रहिवाश्याने माहीती दिली की, नमुद वर्णनाचा इसम हा खंडोबा मंदीराचे मागे उभा आहे वगैरे मिळालेल्या बातमीनुसार सदर इसमास ताब्यात घेवुन नाव पत्त्याबाबत चौकशी करता त्याने त्याचे नाव रामकिशन शंकर शिंदे, वय २४ वर्षे, रा. रुम नं. २, शंकर मंदीराच्या बाजुला, कारेगाव, तालुका शिरुर जि. पुणे मुळगाव मु. बाभुळगाव, ता. शेलगाव, जि. हिंगोली असे असल्याचे सांगुन भोसरी येथील महीलेच्या खुनाची कबुली दिली आहे.

प्राथमिक चौकशीमध्ये सदर इसमाने महीलेचा खुन पैशाची आवश्यकता असल्याने जबरी चोरीच्या उद्देशाने केला असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. सदर आरोपीची पार्श्वभुमी पहाता सदर आरोपीवर जबरी चोरीचा ०१ गुन्हा व फसवुन मोबाईल घेण्याचे ०२ गुन्हे असे एकुण ०३ गुन्हे दाखल आहेत.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.नं. कलम |
|---|---|---|
| १ | कोळसेवाडी, ठाणे शहर | १३/२०१९ भा.द.वि.कलम ४२०,४११, ३४ |
| २ | कोळसेवाडी, ठाणे शहर | ४०/२०१९ भा.द.वि.कलम ४२०,४११, ३४ |
| ३ | कोळसेवाडी, ठाणे शहर | ४३/२०१९ भा.द.वि.कलम ३९२ |

Scanned with OKEN Scanner

सदरची कारवाई ही मा. श्री. अंकुश शिंदे सो. पोलीस आयुक्त, मा. डॉ. श्री. संजय शिंदे सो. अपर पोलीस आयुक्त, डॉ. काकासाहेब डोळे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), डॉ. प्रशांत अमृतकर, सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) व पदमाकर घनवट, सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली गुंडा विरोधी पथकाचे एच.व्ही.माने सहायक पोलीस निरीक्षक तसेच पोलीस अंमलदार- प्रविण तापकिर, सोपान ठोकळ, विक्रम जगदाळे, गंगाराम चव्हाण, गणेश मेदगे, विजय गंभिरे, सुनिल चौधरी, मयुर दळवी, नितीन गेंगजे, शाम बाबा, विजय तेलेवार, रामदास मोहीते, ज्ञानेश्वर गिरी, शुभम कदम व तौसीफ शेख यांनी केली आहे.

(डॉ. काकासाहेब डोळे)
पोलीस उप आयुक्त (गुन्हे)
पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

Scanned with OKEN Scanner